# मी लाचार आहे

बदलणाऱ्या या युगात मनुष्याने भौतिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात फारच प्रगती केली आहे. संस्कृती आणि सभ्यतेमध्येही फार बदलाव आला आहे. पहिल्यापेक्षा अपेक्षा, सुख, सुविधा आणि साधनही वाढली आहेत. लोकांची समझ, ज्ञान आणि अनुभवदेखी वाढत आहे परंतु समाजाच्या क्षेत्रात एक बाब ऐकून आश्चर्य वाटते की, लोक म्हणतात की 'मी बेबस आहे, अकार्यक्षम आहे, फलान्या कार्यासाठी मला बंधनात नका टाकू ते हे ही म्हणतात की, मला माहीत आहे किंवा मी मानतो ही की तुम्ही खरं सांगताय परंतु या कार्याला करायला किंवा त्या व्यक्तीवर किंवा व्यवस्थेवर कार्यवाही करायला मी असमर्थ आहे. व्यक्तीला अशा दुर्बल आणि दुविधापूर्ण स्थितीत पाहून त्याच्या विवशतेवर दया येते. प्रश्न उठतो की अशी काय त्याची मजबुरी असेल? किंवा कुठल्या गोष्टीचा दबाव आहे ही दशा फक्त कुठल्या घराची किंवा संस्थेची नाही तर संपूर्ण राष्ट्र व विश्व या बेबसीचा शिकार आहे. मोठे मोठे प्रधानमंत्री आणि राष्ट्रपतीदेखील या अकार्यक्षमतेच्या कारणाने आपल्या निर्णय क्षमतेला गमावून बसले आहेत आणि अन्याय किंवा अनितिच्या विरूद्ध लढण्याचे साहसही दाखवू शकत नाहीत. मुके व अपंग बनून या दुरावस्थेला बघत राहण्याशिवाय दुसरा मार्गच त्यांच्याकडे राहत नाही. गंभीर चिंतन आणि शोधाचा विषय आहे हा. अकार्यक्षमतेने पछाडलेला हा समाज कुण्या दिशेने जाणार? आणि ज्यांच्यावर नेतृत्वाची जिम्मेदारी आहे ते लोक कुठे घेऊन जातील? आणि कुठवर चालेल हा आंधळा खेळ ?

दृढता आणि धैर्याची कमतरता :- व्यक्ती हा छोटा असो किंवा मोठा, स्वतःच्या कारणाने अकार्यक्षम असो किंवा सार्वजनिक कारणांनी त्यांच्या अकार्यक्षमतेचे कारण दृढता आणि धैर्यतेची कमतरता आहे. जोपर्यंत तुम्ही तुमच्या सिद्धांतांना आदर्शत पूर्णपणे उतरत नाहीत आणि समाज, संगघन किंवा राष्ट्राप्रती पूर्ण जवाबदारीने प्रतिबद्ध होणार नाही तोपर्यंत तुमच्यात या वाईटपणाला विरोध करायला आणि सत्कर्मांना स्वीकारण्याचे साहस आणि दृढता येणार नाही.

नैतिक मूल्यांची कमी :- जर व्यक्तीत कुठे न कुठे स्वतःचा स्वार्थ आहे, पद प्रतिष्ठा याचा लोभ आहे. तो आपल्या कार्यशैलीत मुक्त आणि स्वच्छ नाही, ईमानदार नाही. तो जे म्हणतो तसे करत नाही व जे करतो ते लपवतो. तर अशा दुहेरी व्यक्तीत्वाला लाचार अकार्यक्षम असतो. दुसऱ्या शब्दांत ज्याचे स्वतःच्या स्वभाव, संस्कारावर नियंत्रण नाही, स्वतःची कुठली रीती किंवा नीती नाही, तो दुसऱ्यांवर नियंत्रणही करू शकत नाही आणि आज देशात व विश्वात अशीच स्थिती आहे. त्यामुळे समाजात नैतिक व आध्यात्मिक जागृती आणायला व मुल्यांचे शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. मनुष्य लाचार यामुळे आहे की, त्याचे चित्त भटकलेले आहे. त्यामुळे शुभचिंतन आणि योगाभ्यास करा ज्याद्वारे आपण मनाला एकाग्र करू शकतो आणि लाचारीला दृढता आणि खुशीत परिवर्तन करू शकतो.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com